(पृष्ठ क्र. ४८) डॉ. निशा भंडारे

# सामाजिक चळवळीतील प्रबोधनपर गीते : स्वरूप व मीमांसा

संपादक

**डॉ. प्रवीण ससाणे**



पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर
आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्रातील शोधनिबंध

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्रातील शोधनिबंध

# सामाजिक चळवळीतील प्रबोधनपर गीते : स्वरूप व मीमांसा


संपादक :

**प्रा. डॉ. प्रवीण ससाणे**

विभाग प्रमुख, मराठी विभाग,

अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे.



ज्ञानज्योती प्रकाशन, पुणे

● सामाजिक चळवळीतील प्रबोधनपर गीते : स्वरूप व मीमांसा

● प्रथमावृत्ती : जुलै २०१९

● ISBN : 978-81-940772-0-6

● प्रकाशक :
ज्ञानज्योती प्रकाशन,
३११/३, गल्ली क्र.२, ससाणेनगर,
हडपसर, पुणे-४११०२८.
दूरध्वनी : ९८५०२१३९४२

● किंमत : रू. २००/-

## संपादकीय मनोगत

पुणे विद्यापीठ आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ व २ फेब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या राज्यस्तरीय चर्चासत्रामध्ये सादर करण्यात आलेल्या शोधनिबंधांचे संपादन 'सामाजिक चळवळीतील प्रबोधनपर गीते : स्वरूप व मीमांसा' या ग्रंथामध्ये करण्यात आलेले आहे. अतिशय महत्त्वपूर्ण परंतु काहीशा दुर्लक्षित राहिलेल्या या विषयाच्या अनुषंगाने सिद्ध झालेले हे ग्रंथरूप आपल्या हाती देताना आम्हांला मनःपूर्वक आनंद होत आहे.

समाजप्रबोधनाचे कार्य हे समाजाच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक असते. जगातील कोणत्याही समाजात प्रबोधन करीत असताना प्रबोधनपर विचार व्याख्यान, निबंध, वक्तृत्व इ.सारख्या माध्यमांतून समाज घटकांपर्यंत पोहोचविले जात असतात. हेच कार्य जेव्हा गीतातून होते, तेव्हा ते अधिक उत्कटपणे शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचते. महाराष्ट्राच्या विकासात मध्ययुगीन कालखंडापासून प्रबोधनाचे महत्त्वाचे कार्य गीत माध्यमातून प्रभावीपणे झाल्याचे आपणास दिसते. काहीसे दुर्लक्षित परंतु प्रबोधनाच्या प्रक्रियेत अतिशय महत्त्वाचे असे स्थान प्रबोधनपर गीतांचे आहे. या राज्यस्तरीय चर्चासत्राच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासाच्या वाटचालीत मध्ययुगापासून घडलेल्या वेगवेगळ्या सामाजिक चळवळीतील प्रबोधनपर गीतांचे स्वरूप व त्यांची मीमांसा अल्पस्वल्प का होईना, आम्हांला करता आली. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या चळवळींशी प्रत्यक्ष संबंधित असलेल्या आणि या विषयाचा सखोल अभ्यास असलेल्या विविध तज्ज्ञांचे यानिमित्ताने उद्बोधक मार्गदर्शन आम्हाला लाभले. या मार्गदर्शनाचा विषयाच्या अनुषंगाने एक अक्षरलेख तयार व्हावा, ही मराठी विभागाची अतिशय मनःपूर्वक इच्छा होती. हा ग्रंथ त्या इच्छेचे प्रत्यक्ष रूप होय.

# अनुक्रमणिका


- संपादकीय मनोगत

१. अध्यक्षीय भाषण
– मा. राजकुमार तांगडे/८

२ . सामाजिक उत्थानाच्या चळवळीतील लोककलावंतांचे योगदान
– डॉ.गणेश चंदनशिवे/१३

३. सामाजिक चळवळीतील प्रबोधन गीते : स्वरूप व मीमांसा
– डॉ. प्रवीण सुभाष ससाणे/२०

४. स्त्रीमुक्ती चळवळीतील गीतांची मीमांसा
– प्रा. प्रतिमा परदेशी/२९

५. सामाजिक चळवळीतील गीतांची मीमांसा
– डॉ.शरद गायकवाड/३९

६. आंबेडकर चळवळीतील प्रबोधनकार– शाहीर वामनदादा
– डॉ.धनंजय वाघमारे/४२

७. स्त्री मुक्तीच्या चळवळीच्या गीतांचा लेखाजोखा
– प्रा.डॉ. निशा भंडारे/४८

८. समाजप्रबोधन चळवळीतील आंबेडकरी जलसे
– प्रा. डॉ. जया जितेंद्र कदम/५४

९. सामाजिक चळवळीतील गीतांची मीमांसा
– डॉ.राजाभाऊ भैलुमे/६२

१०. सामाजिक चळवळीतील वास्तव
– जालिंदर घीगे/७०

११. सत्यशोधक चळवळीतील प्रबोधन गीते
– विजय नारायण लडकत/७५

१२. आदिवासी जमातीतील प्रबोधनपर गीते : स्वरूप व मीमांसा
– प्रा. निवृत्ती मारोतराव टार्फे/८५

१३. आंबेडकरी चळवळीचा प्राण शाहीर वामनदादा कर्डक
–डॉ. कल्पना नारायण गावडे/९८

१४. आदिवासी सांस्कृतिक चळवळगीते
– प्रा.डॉ.बागूल एम.एम./१०४

१५. आदिवासी चळवळ आणि सद्य:स्थिती
– प्रा. चिंतामण घिंदळे/११५

१६. नारायण सुर्वे यांच्या साहित्यातून दिसून येणारे कामगार विश्व
– प्रा. डॉ. प्रतिभा शंकर घाग/१२१

१७. आंबेडकर चळवळीतील प्रबोधन गीते
– प्रा. भारतबाई पवार/१२६

१८. शेतकरी चळवळीतील प्रबोधन गीते
– प्रा. मयुर बाळकृष्ण बागुल/१३४

१९. सामाजिक चळवळी आणि साहित्य
– स्नेहल मधुकर पवार /अकत/१४४

२०. स्त्रीमुक्ती चळवळीतील प्रबोधन गीते
– प्रियंका अनिलकुमार खरात/१४७

२१. स्त्री–चळवळ : प्रबोधनपर गीतांचा परिणामकारक वापर
– प्रा. डॉ. शोभा तितर/१५६

२२. आंबेडकरी चळवळीतील प्रबोधनपर गीते
– प्रा.वंदना वसंत सोनवले/१६३

२३. आंबेडकरी चळवळीतील प्रबोधन गीते.
– प्रा. सागर कांबळे/१७१

२४. सामाजिक चळवळी आणि साहित्य
– चंद्रशेखर भारती/१८०

२५. स्त्रीमुक्ती चळवळीतील प्रबोधन गीते
– कु. संगीता रामजी भगत/१८६

२६. आदिवासी चळवळीतील प्रबोधन गीते
–स्नेहल जयराम साबळे/१९५

२७.आंबेडकरी चळवळीतील प्रबोधन गीते
–प्रवीण भगवान वानखेडे/२०२

## ७. स्त्री मुक्तीच्या चळवळीच्या गीतांचा लेखाजोखा

प्रा.डॉ. निशा भंडारे
मराठी विभागप्रमुख
मॉडर्न महाविद्यालय, पुणे

संत, पंत आणि तंत काव्य हा मराठी साहित्याचा परिवर्तनशील प्रवास आहे. तंत काव्य म्हणजे शाहिरी काव्य. यात लावणी व पोवाडा. शृंगार रस लावणीच्या केंद्रस्थानी आहे तर पोवाडाच्या केंद्रस्थानी वीररस आहे. आदर्श आणि वास्तव यांच्यातील हा सनातन झगडा हे शाहिरी कवितेचे खास वैशिष्ट्य आहे, हा झाला इतिहास. आता वर्तमानाकडे वळू. २० व्या शतकाच्या सुरुवातीला स्त्रीमुक्ती, ८ मार्च हा 'जागतिक महिला दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या गोष्टी कानावर पडू लागल्या आणि स्त्रीमुक्तीची चळवळ घराघरात पोहचली. मुळात जिथे असमानता, अन्याय, विषमता दिसत असते तिथे शिक्षण व संस्काराचा अभाव जाणवतो आणि चळवळीच्या माध्यमातून समाजात जनजागृती केली जाते. तसेच चळवळीच्या गीतांमधून सामाजिक, राजकीय, धार्मिकतेवर स्पष्टपणे भाष्य केले जाते. म्हणून सामाजिक प्रबोधनाचे ते एक महत्त्वाचे अंग आहे.

गाणे म्हणणे मनाच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. कारण बर्टोल्ट ब्रेख्ट म्हणतो,

'क्या अंधेरे वक्त में भी गीत गाये जायेंगे?
हां, अंधेरे के बारे में भी गीत गाये जायेंगे!'

'अंधेरे के गीत' म्हणजेच आपली चळवळीची गाणी यात तरुणांच्या आंदोलनाची गाणी, शेतकरी कष्टकऱ्यांच्या संघर्षाची गाणी. दलित चळवळीची, महिला हक्काच्या लढ्यांसाठी गायलेली गाणी, विज्ञान प्रसार करणारी गाणी, पर्यावरणाच्या चळवळीची गाणी इत्यादी महत्त्वाच्या पण दुर्लक्षित झालेल्या विषयांवर भाष्य करणारी, समाजात प्रकाश पसरवणारी गाणी गेल्या अनेक वर्षांचा इतिहास आहे. तो संघर्षाचा गीतात्मक इतिहास आहे. या संदर्भात मेक्सिकन क्रांतीकारी म्हणतो, ''आम्हाला बंदुकीची गरज नाहीये, आम्ही तर नाचत, गाणी म्हणत दडपशाही करणाऱ्यांना गादीवरुन खाली उतरवतो.''

आपल्याकडे संपूर्ण महाराष्ट्र पेटवणारे अनेक कवी व शाहीर होऊन



गेले. तळागाळातील दु:खी, कष्टी, पिडीतांच्या अन्यायाला वाचा फोडली. यात वामनदादा कर्डक, वसंत बापट, कुसुमाग्रज, किसन फागुजी बनसोडे, अण्णा भाऊ साठे, अमरशेख, नारायण सुर्वे, विलास घागरे, संभाजी भगत, अनिरुद्ध बनसोडे, वसुधा सरदार, ज्योती म्हापसेकर, सुमन कात्रे, कल्पना जवळीकर, गुलाब नदाफ, दया पवार, शारदा साठे, शहनाज शेख, निर्मला साठे, गीता महाजन, फैज अहमद फैज इत्यादी कितीतरी नावे क्रांतीकारी काव्य रचणाऱ्यांची सांगता येतील. कुसुमाग्रजांच्या 'गर्जा जयजयकार क्रांती'च्या पासून 'एक तुतारी द्या मज आणून', केशवसुत 'माझी मैना गावावर राहिली माझ्या जीवाची होतीया काहीली' बेळगाव निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, मुंबईची लावणी, मुंबई महाराष्ट्राची हे ठणकावून सांगणारा शाहीर म्हणजे शाहीर अण्णा भाऊ साठे. इतिहासाने याची नोंद घेतली. क्रांतीची मशाल पेटविली ती १ मे १९६० ला 'महाराष्ट्र' स्वतंत्र राज्य झाल्यावरच विझवली. इतकी ताकद क्रांतीकारी चळवळीच्या गीतांमध्ये आहे.

'मनुस्मृती'च्या पानांवर शूद्र व स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या ओळी लिहिल्या गेल्या व विषमतेमुळे स्त्रियांवर अन्याय झाला. 'न स्वतंत्र मर्हती नारी.' लहानपणी पित्याने, तरुणपणी पतीने व वृद्धपकाळात पुत्राने तिचे संरक्षण करावे. म्हणजे ती दुर्बल आहे असं ठरवून टाकलं. पण तो मनू हे कसं विसरला जी अनंत यातना सहन करुन नऊ महिने गर्भ सांभाळून एक जीव जन्माला घालते, ती दुर्बल कशी? ती धीट, हुशार, खंबीर, सबलच आहे. हे स्त्री सतत दाखवत आलेली आहे आपल्या कृतीतून. महात्मा फुले म्हणत होते की, अन्याय कारण मनुस्मृती एखाद्या मनीने लिहीली असती तर अशी विषमतावादी रचना तिने केली नसती. म्हणून ही मनुस्मृती जाळली पाहिजे. त्याला पर्याय म्हणून नवीन ग्रंथ लिहिले पाहिजे. चांगले विचार पोहचविले पाहिजे. आणि त्यांच्या शिष्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसें.१९२७ ला मनुस्मृती जाळली व समानतेवर आधारित संविधान आले. म्हणून मी म्हणते,

''बाई मनुच्या कायद्यानं बाई जात होती सती.
सावित्रीच्या शिक्षणानं बाबासाहेबांच्या संविधानानं बाई झाली राष्ट्रपती''

सती ते राष्ट्रपती असा प्रवास ती करते. पण एक महिला राष्ट्रपती झाली म्हणणे समाजात सुखी आनंदी आहेत का? तर नाही. आपण तळागाळातील,

वाड्यावस्त्यांवर, खेडोपाडी गेलो तर अजूनही आपल्याला धूसरचं चित्र दिसते. आणि मग स्त्री मुक्तीच्या चळवळीत या महिलांना सामावून घेण्यासाठी स्त्री संघटना पुढे येतात. यात कष्टकऱ्यांची निशा गुरव यांची संघटना, उषा वाघ यांची 'दलित महिला फोरम' संघटना पुढे येताना दिसतात. अनेक बचत गटांच्या संघटनांमधून वस्ती पातळीवरील बौद्धाविहारमधून सतत कार्यक्रमांच्या माध्यमातून– उदा. ८ मार्च 'महिला दिन' ३ जाने. सावित्रीबाई फुले जयंती, १२ जानेवारी जिजाऊ जयंती अशा प्रसंगांच्या निमित्ताने ही चळवळीतील गाणी समाजासमोर गायीली जातात. वसुधा सरदारांची 'सावित्रीची ओवी' संपूर्ण सावित्रीचा जीवनपट उभा करते.

पहिली माझी ओवी गं, सावित्रीच्या बुद्धीला, स्त्रियांच्या शिक्षणाचा पाया घातला. अशिक्षित, अडाणी पतीपाशी शिकली, मुलींसाठी पहिली शाळा काढली.

अशी सुरुवात होऊन सनातनी समाजाने कसा त्रास दिला, अन्यायाविरुद्ध ती कशी लढली, विधवेचे मुल दत्तक घेतले. विधवांना, अनाथांना आधार दिला. शूद्रांसाठी शाळा काढल्या व पतीपेक्षा काकणभर सरसच ठरली. फुले गेल्यावर सत्यशोधक समाजाची धुरा वाहिली. भाषणं केली. अंधश्रद्धेवर, शिक्षणावर कविता रचल्या हे सगळ चार ओव्यांमध्ये शब्दबद्ध केले व शेवटच्या चरणात आव्हानही केले.

'जोतिबाची सावली नाही तू सत्यधर्म प्रकारात तेलानं तळपली.'
'दुःखितांच्या सेवेत देह तू ठेविला, स्मरण तुझे करुनी वसा मी घेतला
भगीनींना जागवित संघटित करीन, ज्ञानज्योत लावीन हेच तुला नमन'

म्हणजे क्रांतीकारी सावित्री एकटी करू शकली तर तुम्ही आम्ही सगळया मिळून अन्यायाविरुद्ध लढा देऊ असं स्फुलींग चेतवलं जाते आणि 'चल ग हिरा, चल ग मीरा' या गीतातून पुरुषांच्या राज्यात, कष्ट करणाऱ्या बायकांचे घरीदारी हाल होतात. तो लढा प्रत्येकीचा आहे. कंत्राटदार, मालक, सावकार हया सगळयांच्या विरोधात ती पेटून उठते.

''चल गं हिरा चल ग मीरा चल गं बायजा बाई
मागं काही नाही आता तटून उभी राही''
''दोन प्रहरचा दिवस आला, अन्यायाचा कळस झाला''

पुरुषांच्या राज्यामध्ये बाई समान नाही. मागं काही नाही.



अशाच अर्थाचा श्रमिक संघटनेच गीत आहे.

''वेणू बाई, चला बाई, चला एकजुट करा,
स्त्री मुक्तीचा देऊ लढा
अगं वेणूकाम कशाला राहते
दबून दबून चल मोर्चाला जाऊ
खाल्या लाथा आजवरी,
गुलामगिरीतून राहूनी चल उठ आता,
पुढे होऊ स्वतः अगं वेणूबाय राजकारणात जाऊ या
लवून पुढाकार घेऊ या,
पुरुषाची सत्ता नको खाई आता, अगं वेणूबाय''

या गाण्यांमधून तिला साध्या शब्दातून, भाषेतून पटवलं जातं, तिचं एकटीचं दुःख नाही तर हे सगळ्यांचं आहे, कमी-अधिक प्रमाणात असेल पण त्रास, कष्ट, व्यसनाची बळी तीचं ठरते. म्हणून येथे संघ भावनेने लढण्याची ताकद दिली जाते व राजकारणातही सत्तेच्या ठिकाणी पोहचण्याची इच्छा तिच्यात निर्माण केली जाते.

आपल्या स्त्रिया शिक्षणाच्या संस्काराच्या अभावामुळे जास्त वळलेल्या दिसतात. प्रगतीच्या आड अंधश्रद्धा येते. यावरही अनेक गीते आहेत. आजही शनी शिंगणापूरचा किस्सा असो वा शबरीमला महिला प्रवेशबंदी असो, उच्च न्यायालयाच्या निर्णयाला जुमानलं जात नाही व प्रवेश करणाऱ्या स्त्रियांकडे जणू काही त्या गुन्हेगारच आहेत असं पाहिलं जातं. येथे त्यांची कीव करावीशी वाटते आणि या पुरोगामी समाज सुधारकांच्या महाराष्ट्रात २० व्या शतकात हे घडतं खरंच लाजीरवाणी आहे आणि गीत आठवतं. शाहीर लक्ष्मण केदारे यांचे,

बुद्ध, कबीर, भीमराव, फुले या भूमीवर फुले या भूमीवर जन्मले
त्यांनी जनजीवन फुलविले ग, शेजारीण सखये ग बाई
देव अंगात वागतो, कर शब्दाला जागतो
का भगत भीक मागतो गं, शेजारीण सखये बाई
[illegible] नवसांमुळं, ही बुद्धी मातीच्या मिळ
हे कसं तुला ना कळं ग, शेजारीण सखये बाई
मनी ठेऊनी तू विश्वास, धर विज्ञानाची कास,

प्रगतीचा मार्ग तुला खुला गं, शेजारीण सखये बाई

या गाण्यातून नुसती अंधश्रद्धा नाही तर शिक्षण, विज्ञान किती महत्त्वाचे आहे हे सांगितले जाते. ह्या गीताच्या आधारे आम्ही शनीविषयी बायकांशी बोलतो. ज्या शनीला बाई चालत नाही तो शनी पत्रिकेत काय करतो, त्याचा जन्म कसा झाला, बाईच्या स्पर्शाने कोपतो तो गाईच्या गोमुत्राने पवित्र होतो का? हा कुठला न्याय? विचारांना प्रवृत्त करणारी ती गाणी आहेत. अनिसंचे कार्यकर्ते ज्यावेळी 'सॉक्रेटिस ते पानसरे, कलबुर्गी' रिंगण नाट्य सादर करते त्यात अशीच चळवळीची गाणी म्हणत प्रेक्षकांना विचार करण्यास प्रवृत्त करतात. म्हणजेच ताल, लय, गेय यातून मनोरंजनाबरोबर प्रबोधनही होते. आजच्या तरुण पिढीपुढे हे आलं पाहिजे. ही जबाबदारी आपलीच आहे. शाहीर अनिरुद्ध बनसोडे हे मराठी, एम.ए. आहे. ते 'मी वादळवारा' या भीमगीतांच्या कार्यक्रमातून जनजागृती करतात व स्वत:चा उदरनिर्वाहही चालवितात.

स्त्रिया घराबाहेर पडतात, चळवळीत उतरतात, मोर्चे, आंदोलनात भाग घेतात, न्याय व हक्कासाठी उंबरठा ओलांडतात हे घरातील पुरुषांच्या परवानगीनेच. यासंदर्भात शहनाज शेख यांच गीत 'मैं अच्छी हूँ, घबरावू नको ऐसा खतमें लिखो' यातून लिहायला, वाचायला न येणारी बाई दुबईला असणाऱ्या नवऱ्याला दुसऱ्यांकडून पत्र लिहून घेते. पत्रातून आजूबाजूच्या परिस्थितीची माहीती देते. पण तिच्या नवऱ्याला तिचं वागण्याविषयी वेगळचं बोलतात. तेव्हा ती सगळ्या गोष्टींची परवानगी मागते व शेवटी म्हणते, तुम्हीपण मला साथ द्या. उदा. महिलांनी शिकलं पाहिजे, तिला बाहेरचं जग कळलं पाहिजे, बायकांना घरगुती मारहाण होते, तिला सोडवायला गेलं पाहिजे, तेव्हा आपण दोघे मिळून हे कार्य करु, म्हणजेच स्त्री-पुरुष समानतेचं बीज या गाण्यात दिसून येतं. या गीताचे मराठी भाषांतर गीता महाजन व नारायण सुर्वे यांनी केले आहे.

'तुम्ही सुखात सम्दी राव्हा आसं पत्रात लिवा
कोण्या मेल्यानं तुम्हा कळविलं मी ठुमकते रस्त्यावर
संशय माझा आला तुम्हातर नाही जाणार बाहेर
पाणी आणायला जाऊ का नको आसं पत्रात लिवा'

माधव चव्हाण यांनी 'स्त्री मुक्तीचे ललकारी' या प्रेरणादायी गीतातून



स्त्रियांचं विश्वच मांडलं आहे. त्यांना होणारा त्रास त्यावर त्यांनी केलेली मात व सगळ्या मिळून अन्यायाविरुद्ध लढलं पाहिजे यासाठी एकी महत्त्वाची आहे. स्त्रीचं स्त्रीची शत्रू हे विसरुन आता हातात हात घालून एकसाथीनं पुरुष सत्ता, सनातनी विचारधारेला आवाहन करुन स्वत:ची जागा निर्माण करु पाहते.

''स्त्री मुक्ती ही ललकारी भिडते गगनाला
सनातन्यांनो, पिळणाऱ्यांनो जाणा समयाला
पिता,पती अन् पुत्र लादती इच्छा आपली नारी वरती
समानतेचे हक्क मागता हसती तिच्या धैर्याला
पंतप्रधान असो देशाची अधिकारी अन् कुणी राज्याची
नारी तरीही अबला म्हणती बांधती संसारा
कारकून वा शेतमजूर ती तज्ञ सुज्ञ शास्त्रज्ञ असो ती
घरामध्ये आणि कामावरतीझटते जगण्याला
चला भगिनींनो जूट उभारु समानतेची ध्वजा फडकवू
श्रमणाऱ्यांचा कोट बांधूनी मिळवू मुक्ती''

अशी स्फुर्ती देणारी गीते आज पुन्हापुन्हा म्हणाविशी वाटतात. कारण ही नुसती गाणी नसून आग आहे, संघर्ष आहे, बाईचं जगणं आहे, ते जाणून घेणं हे आपले कर्तव्य आहे.

संदर्भ :

१. उठ माणसा गाणी संघर्षाची, प्रकाशक- अलका जोशी, लोकायत